REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# आंतरराष्ट्रीय व्यापार व स्वदेशी चळवळ

प्रा. डॉ. एन.बी मठपती
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्री. व. ना. कला व श्री अ.ना. वाणिज्य
महाविद्यालय मंगरुळपीर.

**प्रस्तावना :**

आजच्या या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वातावरणात स्वदेशीच्या आंदोलनास एक विशेष महत्व आहे. 'स्वदेशी' हा शब्द उच्चारला की कुठेतरी प्रतिगामी विचार, जुन्यास चिटकून राहण्याची मानसिकता, अशी कल्पना अनेकांच्या मनात येते. पण इथे एक बाब प्रामुख्याने लक्षात घेणे आवश्यक आहे. व ती म्हणजे स्वदेशी ही पुनर्जीवनवादी चळवळ (Revivalist movement) नाही, तर राष्ट्र जीवनाकरिता 'राष्ट्रवाद' या मूल्याचे प्राणपणाने रक्षण करण्याकरिता चालणारे ते आंदोलन आहे. स्वातंत्र आंदोलनात ब्रिटीशांच्या साम्राज्यवादी, वसाहतवादी धोरणास विरोध करण्याकरिता महात्मा गांधींनी या तत्वाला एक लोकचळवळीचे रुप दिले. शंभर दीडशेवर्षाचे ब्रिटीश अधिपत्य त्यात लष्करी सामर्थ्याबरोबर, कुटनीतीच्या सहाय्याने समाजातील सुशिक्षित वर्गास आपल्या शासनाचे व विचारवंत आकर्षण निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सर्वाच्या जोडीला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात एक पुरोगामी आधुनिक विचारांचे राज्यकर्ते म्हणून आपली प्रतिमा निर्माणकरण्याचाही ब्रिटीशांचा प्रयत्न, त्यामुळे या शक्ती बरोबर संघर्ष करुन स्वातंत्र मिळविणे ही साधी बाब नव्हती. यातही सामान्य जनतेच्या मनात एक प्रकारची हतबलता होती. प्राक्तनाचा एक भाग म्हणून जनता ते सहन करीत होती. अशा काळात महात्मा गांधींनी स्वदेशीचा नारा दिला. त्यापुर्वी लो. टिळकांनी देखील स्वदेशी विचार मांडला होता. पण त्यावेळी ती जनतेची चळवळ नव्हती. महात्मा गांधीनी त्याला व्यापक आधार दिला. भारतीय माणसाची मानसिकता लक्षात घेत त्याला ऐ धार्मिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न देखील गांधीनी केला. या चळवळीला नवा आशय प्राप्त झाला. महात्माजींच्या 'स्वदेश' विचारांचा संबध सर्वोदय व त्यांच्या विश्वस्तांच्या संकल्पनेशी आहे. अर्थव्यवस्थेचे स्वरुप असे असावे की त्यात सर्वाना विकासाची व समृद्ध जीवन जगण्याची संधी मिळेल. या विचारात ओरबडण्यास किंवा दोहनास स्थान नाही. इतरांना त्यांच्या विकासात सहाय्य करत स्वतःचा विकास ही या मागची मूख्य भावना आहे. म्हणजे परस्पर सहकार्यातून विकास, सह अनुभूतीतून विकास गांधींना अभिप्रेत होता. महात्मा विश्वस्ताच्या कल्पनेत देखील 'माझ्या गरजेपेक्षा अधिक संपत्तीवर माझा नव्हे तर संपूर्ण समाजाचा अधिकार आहे. मी या संपत्तीचा मालक नव्हे तर विश्वस्त आहे' ही भावना रुजवणे महत्वाची असल्याचे त्यांना वाटत होते.

महात्मा गांधीचा हा विचार स्वप्नरंजनासारखा किंवा एक कल्पना विलास असल्याची टीका बरेचदा होते. प्रत्यक्षात हा विचार पूर्णपणे अमलात आणणे अशक्य असल्याचे देखील त्यांच्या टीकाकारांचे मत आहे. कदाचित हे खरेही असेल पण हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मार्गक्रमण करीत राहिल्यास पूर्ण जरी नाही तरी अर्ध्यापेक्षा अधिक समस्या सुटतील यात शंका नाही. महात्मा गांधींच्या विचाराचा संबंध माणसाच्या उपभोगवादी मलप्रवृत्तीवर



नियंत्रण ठेवण्याशी आहे. त्यामुळे तो कठीण व अव्यवहार्य वाटतो. पण विकसनशील व अविकसित राष्ट्रांना आपले स्वातंत्र्य अबाधित राखायाचे असेल तर आपल्या गरजांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर 'चिरंजीवी विकास' (Sustainable Development) या व्दारेच ते शक्य आहे. कारण गरजपूर्तीच्या साधनांना देखील एक मर्यादा आहे. एका बाजूस वाढत राहणारा अमर्याद उपभोग व दुसऱ्या बाजूस मर्यादित साधने यातूनच शोषण होईल. एक समाज दुसऱ्या समाजाचे करेल, निसर्गाचे करेल व यातून काही समृध्द होतील पण काहींना जगणे अशक्य होईल. स्वदेशीला

हे अपेक्षित नाही. आपल्या गरजांना एका मर्यादेनंतर सीमित करण्याचा गांधीजींचा विचार भौतीक उन्नती नाकारण्याचा नाही. तर एका बाजूस अनियंत्रित उपभोगाच्या मार्गाने जाणाऱ्या विकसनशील देशातील नवश्रीमंत वर्गास सर्वसाधारण जनतेप्रती संवेदनशील दायित्वपूर्ण व जागृत करण्याचा प्रयत्न आहे.

स्वदेशीच्या कल्पनेत नवीन तंत्रज्ञानास विरोध आहे. ही कल्पना परंपरावादी आहे. असाही एक आक्षेप घेतला जातो. पण त्यात फारसे तथ्य नाही. गांधीजींची टकळी, चरखा, सुतकताई, खादी यास एक प्रतिकात्मक महत्व होते व आहे. 1908 मध्ये गांधीजींनी हा विचार मांडला व 40–42 पर्यंत त्यांचा पाठपूरावा केला. त्याला एक सामाजिक व राजनैतिक संदर्भ होता तो वगळून स्वदेशीची चिकित्सा चुकीची ठरेल. काळ बदलला, परिस्थिती बदलली की प्रत्येक तत्वास नवीन आश्यय द्यावा लागतो. त्याचे पुनर्स्पष्टीकरण करावे लागते. स्वदेशीच्या विचारात स्वदेश प्रेम, राष्ट्रभक्ती हा विचार महत्वाचा आहे. नव्या संदर्भात हा मुळ गाभा कायम ठेवत विचार केला तरच विश्वव्यापारातून निर्माण होणाऱ्या धोक्यापासून आपण सुरक्षित राहू शकू यासंदर्भात पं. दीनदयाल उपाध्याय यांचे विचार उल्लेखील आहेत 'स्वदेशीच्या कल्पनेस जुनाट प्रतिगामी कल्पना म्हटले जाते. विदेशातील प्रत्येक वस्तू, त्यांचे विचार, त्यांची व्यवस्थापध्दती, उत्पादन प्रणाली इतकेच नव्हे तर उपभोगाचे मानदंड देखील आम्ही आवडीने स्वीकारतो व सर्वच क्षेत्रात परावलंबी होत जातो. पण हा प्रगतीचा मार्ग नाही. यातून विकास साधला जाणार नाही. 'स्व'च्या विस्मृतीतून पारतंत्र येईल. स्वदेशीच्या या भावनात्मक स्वरुपास समजून घेणे महत्त्वाचे आहे.

आर्थीक धोरणांच्या संदर्भात स्वदेशाचा विचार करताना आपला प्राध्यान्यक्रम कोणता? हे ठरविणे महत्वाचे आहे. प्रत्येक राष्ट्र त्याच्याजवळ असणाऱ्या साधनसामग्रीच्या आधारावर प्राधान्यक्रम ठरविते. म्हणूनच प्रत्येक देशाची विकासाची प्रतिकृती वेगवेगळी असते. आपल्या देशाचा प्रमुख उद्योग शेतीचा आहे. त्याआधारे आपण स्वयंपूर्ण होऊ शकतो. इतरावंर अन्न – धान्याच्याबाबतीत फारसे अवलंबून राहता येत नाही. देशाची लोकसंख्या 100 कोटीची आहे ही जनात काम मागते ते पुरविण्याचे सामर्थ्य कमी अधिक प्रमाणात लघूउद्योग, गृहउद्योग व शेतीत आहे या परिस्थितीत विकासाचा अग्रकम ठरविताना शेती लघुउद्योग, गृहउद्योग यांना प्राधान्य देणे हा स्वदेशीचा खरा अर्थ आहे. हीच विकासाची स्वदेशी प्रतिकृती होय. पण इतर आयातीबरोबर विकासची प्रतिकृतीच आयात करायचे ठरवले तर सर्व उद्योग, व्यवसाय विसकळीत होतील. हात बेकार होतील व यातून अंतर्गत सुरक्षा धोक्यात येईल नवीन संदर्भात हा स्वदेशीचा अर्थ असावा. 1980 ते 1992 च्या काळात वैयक्तीक बचत 6 लाख 52 हजार कोटी होती व तो एकुण बचतीचा हा 80 टक्के हिस्सा होता व यातूनच सरकारने विकासाचे कार्यक्रम राबवावे ही अपेक्षा होती. पण उपभोगवादी संस्कृतीने ही बचतीची सवयच मोडण्याचा घाट घातला आहे. आज आपण आपल्या वैयक्तीक खर्चाचा जरी विचार केला तरी साबण, शॅम्पू, तेल, मुलांची खेळणी या सर्वावर आपण किती खर्च करतो व त्यातील किती पैसा आपल्या देशात राहतो हा विचार आवश्यक आहे. या वस्तूंची उत्पादने तर बहुराष्ट्रीय कंपन्यांची असतील तर आपण त्यांचीच अर्थ व्यवस्था मजबूत करण्याकरिताच खर्च करतो असे होईल गांधीच्या स्वदेशीच्या कल्पनेत उपभोगास स्थान नाही असे नाही. पण खर्च होणारा पैसा देशांतर्गतच उद्योब वाढविण्यात व्हावा ही कल्पना आहे. पैसा चलनात असावा पण तो परदेशात फारसा जाता कामा नये ही वृत्ती असावी हे स्वदेशीला अपेक्षीत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या देशातील आधारभूत संरचना (Infrastructure) विकसित करण्याऐवजी, टि.व्ही., फ्रीज, टेपरिकॉर्ड, इलेक्ट्रोनिक वस्तू यांच्या निर्मितीत भांडवल गुंतवणूक करते व त्यांच्या विक्रीकरिता त्यांना भारतीय बाजारपेठेचे आकर्षण आहे. एक ग्राहक म्हणून आपण तारतम्य ठेवले पाहिज. खरे तर बाजारपेठेतील 'ग्राहक' हा महत्वाचा घटक या आक्रमक व्यापारास आळा घालू शकतो. पण त्याकरिता 'स्वदेशी' भाव, स्वदेशी विचार महत्वाचे आहे. आज हा प्रवास असाच सुरु राहिला तर उद्या स्वदेशी वस्तू मागू म्हटल्या तरी त्या बाजारात नसतील शेतकरी बी–बीयाणाकरिता मोनसेंटो या अमेरिकन कंननीवर अवलंबून असेल. शेती सबसीडी कमी झाली तर शेती परवडत नाही म्हणून बहुराष्ट्रीय कंपन्याना ठेक्याने द्यावी लागेल. औषधे अमेरिकन कंपनीची व ते सांगतील त्या किंमतीची. अन्नधान्याचे भाव असेच घसरत गेले तर शेतकरी खचुन जाईल व अन्नधान्याकरिता परदेशावर अवलंबून राहावे लागेल, असे परावलंबित्वच सरते शेवटी पारतंत्र्यात परिवर्तीत होईल. इराक अफगाणिस्थानमध्ये जशी, सरकारे तुमची असावी कारभार मात्र आमच्या तंत्रानेच चालावा, अशी स्थिती सर्वत्र निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे राजकीय गुलामगीरीचेच लक्षण आहे.

म्हणूनच आंतरराष्ट्रीय व्यापार तारतम्य ठेवणे महत्वाचे आहे. चीन व जपानही आज आंतरराष्ट्रीय व्यापारात आहे. पण त्याकरिता या राष्ट्रांनी आपल्या घाटणीची आपली अर्थव्यवस्था प्रथम मजबूत केली. आयात धोरण ठरविताना आपल्या अर्थव्यवस्था धक्का लागणार नाही. याचीकाळजी ही राष्ट्रे सतत घेत असतात. व्यापाराचे क्षेत्र

विस्तारणे व आंतरराष्ट्रीय होणे स्वाळााविक आहे. ते व्यवहार्य देखील आहे. पण त्यात आपला आत्मसन्मान कायम राखता यावा ही स्वदेशी मागची मूळ भावन आहे. भारत म्हणून आपली वेगळी ओळख (Identity) कायम राखली जावी हे खऱ्या अर्थाने स्वदेशीला अपेक्षित आहे.

स्वदेशीच्या चळवळीचा पोत इतर चळवळीपेक्षा वेगवेगळा आहे 'स्वराष्ट्रहिताची' ही भावना सतत जागृत ठेवण्याची तेवत ठेवण्याची ती चळवळ आहे. या चळवळीचा संबंध प्रामुख्याने माणसाच्या अभिवृत्तीशी आहे. या चळवळीच्या माध्यमातून होणारे परिवर्तन कदाचित मंदगतीने होईल पण ते चिंतजीवी असेल. यात होणारा लाभ तात्काळ दिसणार नाही. पण तो दिर्घकाळ पुरणारा असेल व त्यात स्वाभिनाला तडा देखील जाणार नाही. ही चळवळ गुणात्मकरित्याच वेगळी आहे. यात स्वदेशीचा विचार आहे पण परदेशाशी वैर नाही. कारण सर्वेपिसुखिन संतू सर्वेसंतु निरामय या भाव तत्वावर ती आणारीत आहे.

आपल्या स्वातंत्र्यदिनी व प्रजासत्ताकदिनी भारत चिरायू होवो, स्वातंत्र्य चिरायू होवो असा उद्घोष आपण करतो. पण हे चिरंजीवत्व कोणासारखे असावे? अश्वत्थाम्या सारखे काय? की डोक्यावरची जखम भळभळ वाहते आहे व तो हातात वाटी घेऊन तेलाची भीक मागत फिरतो आहे, की सामर्थ्याचे प्रतिक असणाऱ्या हनुमंतासारखे? निर्णय आपल्याला घ्यायची आहे व लवकर घ्यायचा आहे कारण परिवर्तनाचा वेग तीव्र आहे.

## संदर्भ –


1) बाजपायी माणिकचंद – स्वदेशी की ललकार, पृ.– 25
2) गोविलकर विनायक – जागतिकरण कुणासाठी, कशासाठी? अर्थसंवाद, जून 2006, खंड 29.1, पृ. 31
3) शर्मा महेशचंद्र – डंकल ड्राफ्ट, ग्रॅट फाईनल ॲक्ट, डब्लू टी. ओ. हमारी अंतराष्ट्रीय प्रतिक्रियाएँ पृ. 12
4) गोविलकर विनायक – धरमपेठ महाविद्यालयातील व्याख्यानाचा आधारावर
5) बाजपेयी माणिकचंद – स्वदेशी की ललकार, अर्चना प्रकाशन, शिवाजी नगर, भोपाळ